# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**2022**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **मध्यवर्ती कक्ष** **दिनांक ०२/०६/२०२२**

## अवैद्यरित्या देशी बनावटीचे रिव्हॉलवर व तीन जिवंत काडतुस बाळगणा-या सराईत गुन्हेगारास एकूण 61,400/- रू किमतीचा मुद्देमालासह गून्हे शाखा, मध्यवर्ती कक्ष नवी मुंबई यांनी केली अटक

नवी मुंबई परिसरात ‘अवैद्यरित्या शस्त्रे बाळगणा-या इसमांविरूध्द कारवाई करण्याबाबतची’ विशेष मोहिम राबविणेबाबत मा. पोलीस आयुक्त श्री बिपीन कुमार सिंग, यांनी आदेशित केले होते. त्या अनुषंगाने मा. सह पोलीस आयुक्त डॉ. श्री. जय जाधव , मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री. सुरेश मेंगडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त यांनी नवी मुंबई परिसरातील अवैद्यरित्या शस्त्रे बाळगणा-या इसमांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजयसिंह भोसले यांचे मार्गदर्शनाखाली अवैद्यरित्या शस्त्रे बाळगणा-या इसमांविरूध्द कारवाई करणेकामी सपोनि/शशिकांत पवार, पोउपनिरी संजय रेड्डी व पोलीस अंमलदार यांचे पथक नेमण्यात आलेले होते. मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई येथील आतिष राजाराम कदम, पोहवा/१६९२, नेम.मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई. यांना मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून रबाळे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दीतील गवळी देव डोंगराजवळील रोडवर कौशल्यपुर्ण व वेशांतर सापळा रचुन खालील नमुद इसमास अटक केली व त्यांचेकडून खालील नमुद मुद्देमाल हस्तगत केलेला आहे. सदरबाबत रबाळे एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. १४२/२०२२ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन मध्यवर्ती कक्षाकडुन पुढील अधिक तपास चालु आहे. तपासादरम्याण अटक आरोपी अयाज शफी मन्सुरी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर मुंबई शहर येथे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

- **अटक आरोपीचे नाव :-**

  १) **अयाज शफी मन्सुरी, वय ३५ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. रूम नं. ३०२, तिसरा माळा, शिरीन अपार्टमेंन्ट, चरणीपाडा रोड, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे**

- **अटक आरोपीकडुन उघड गुन्हा :-**

  १) नानी दमण पोलीस स्टेशन, जि. दमण :- गु.रजि. क्र. ३६/२०२२ भादविस कलम ४५४,३८०

- **<u>आरोपीवर यापुर्वी दाखल गुन्हयांची माहिती</u>** :-

  १. डि.सी.बी. सीआयडी, मुंबई :- गु.र.क्र ४३/२०१० भादविस कलम ३९६,४५२,१७०
  २. डि.सी.बी. सीआयडी, मुंबई :- गु.र.क्र ५५/२०१० भा.ह.का. कलम ३,२५
  ३. डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई :- गु.र.क्र. १०८/२०१० भादविस कलम ३९२,४५२,३२ सह भा.ह. कायदा कलम ३,२५
  ४. कुर्ला पोलीस ठाणे, मुंबई :- गु.र.क्र. १४४/२०१६ भा.ह.कायदा कलम ३,२५

- **<u>हस्तगत मालमत्ता</u>** :-

१) ६०,०००/- रु एक स्टेनलेस स्टिलचे देशी बनावटीचे रिव्हालवर, ग्रिप व ग्रिपचे दोन्ही बाजुला लाकडी पट्टीस्क्रुने फिट केलेली. त्यात काडतुस करीता पाचछिद्र असलेले सिलेंडर (रोलर) असलेले.

२) ९००/- रू.किंचे तीन जिवंत काडतुस त्यावर **K.F. 32 S&W.L** असे लिहीलेले. प्रत्येकी ३००/- रू.

३) ५००/-रू. रोख रक्कम, त्यात १००/-रू. दराच्या ५ भारतीय चलनी नोटा. प्रदर्शित क्रमांक ‘सी’

..............................

६१,४००/-रू एकुण

**सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री बिपीन कुमार सिंग, मा. सह पोलीस आयुक्त डॉ. श्री. जय जाधव , मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री सुरेश मेंगडे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली -**

**मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनि विजयसिंह भोसले, सपोनि/शशिकांत पवार, पोउपनि/संजय रेड्डी, पोलीस अंमलदार -आतिष कदम, सचिन टिके यांनी केलेली आहे.**

**-----000-----**


नवी मुंबई पोलीस आयुक्तालय
गुन्हे शाखा
मध्यवर्ती कक्ष
NAVI MUMBAI POLICE COMMSSIONERATE
CRIME BRANCH
CENTRAL UNIT